देवेंद्र फडणवीसांची हॅटट्रिक, सलग तिसऱ्यांदा शतकेपार झेंडा; भाजप विजयाचा नवा रेकॉर्ड >> पान 2

जिल्ह्यात चार जागांवर भाजपचा बोलबाला >> पान 3

मेहकर विधानसभा मतदार संघात उबाठाचे सिद्धार्थ खरात विजयी >> पान 4

**सुविचार**

शब्द जपून वापरावेत, शब्दांची धार तलवारीपेक्षा तीक्ष्ण आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई आतील पान

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 104 ■ रविवार, दि. 24 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




राजकारणात 'हे' कधीच जमलं नसतं

# महाराष्ट्रात महायुतीची सत्ता

## काँग्रेसचे बडे मोहरे गळाले, महायुतीचा मुख्यमंत्री आज रात्री किंवा उद्या ठरणार; सोमवारी शपथविधी?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालाचं चित्र जवळपास स्पष्ट झालं आहे. राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीला दणदणीत यश मिळालं आहे तर महाविकास आघाडीची जोरदार पिछेहाट झाली आहे. भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. भाजपचे उमेदवार जवळपास १३० जागांवर आघाडीवर आहेत, तर शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार ५४ जागांवर आघाडीवर आहेत, दुसरीकडे राष्ट्रवादी अजित पवार गटानं देखील जोरदार मुसंडी मारली आहे. ४० जागांवर राष्ट्रवादीचे उमेदवार आघाडीवर आहेत. मात्र दुसरीकेड महाविकास आघाडीला जबर पराभवाचा धक्का बसला आहे. महाविकास आघाडीतील तीनही प्रमुख घटक पक्ष मिळून ७५ चा आकडा देखील गाठू शकलेले नाहीत. दरम्यान आता उत्सुकता निर्माण झाली आहे ती म्हणजे नव्या सरकारचा शपथविधी कधी होणार त्याची.**



दरम्यान नव्या सरकारच्या शपथविधीबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. येत्या सोमवारी किंवा मंगळवारी नव्या सरकारचा शपथविधी होणार आहे. वानखेडे स्डेडियम किंवा शिवाजी पार्कवर नव्या सरकारचा शपथविधी होणार आहे, अशी माहिती समोर येत आहे. त्यामुळे आता नव्या मंत्रिमंडळात कोणाची वर्णी लागणार? मुख्यमंत्री कोण होणार याबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.



महाविकास आघाडीला विधानसभा निवडणुकीमध्ये मोठा धक्का बसला आहे. संगमनेरमधून काँग्रेसचे दिग्गज नेते बाळासाहेब थोरात यांचा पराभव झाला आहे. तर दुसरीकडे तिवसामधून यशोमती ठाकूर यांना देखील पराभवाचा धक्का बसला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले देखील पिछाडीवर असल्याची माहिती समोर येत आहे. काँग्रेसप्रमाणेच शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या देखील दिग्गज उमेदवारांचा पराभव झाला आहे.

दरम्यान आजच्या निकालावर भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. एखाद्याला जर जाणून बुजून टार्गेट करण्यात आलं तर ते लोकांच्या लक्षात येतं. महाविकास आघाडीनं फेक नॅरेटीव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला पण यावेळी तो फसला, महाराष्ट्रातील जनता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झालं असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

### राजपुत्र अमित ठाकरेंचा दारुण पराभव; राज ठाकरेंना मोठा धक्का

मुंबई : माहीम विधानसभा मतदारसंघातून ठाकरे गटाचे उम`दवार महेश सावंत यांचा विजय झाला आहे. माजी मुख्यमंत्री आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी महेश सावंत यांना माहीमम ध्ये भगवा फडकलाच पाहिजे, असा आदेश दिला होता. त्यानंतर महेश सावंत यांनी शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार सदा सरवणकर आणि राजपुत्र अमित ठाकरे यांचा दारुन पराभव करत माहीममध्ये बाजी मारली.



**महायुती : २३६**

भाजप : १३२ शिवसेना : ५७ राष्ट्रवादी ४१ इतर : ०६

**महाविकास आघाडी : ४६**

उबाठा गट : २० काँग्रेस : १६ एनसीपी (शरद पवार गट) : १०

## ठळक...

### भाजप उमेदवार राजेश पाडवी यांच्या विजयानंतर प्रतिक्रिया



दैनिक आपला विदर्भ

**नंदूरबार/प्रतिनिधी :** शहादा तळोदा येथील भाजपाचे उमेदवार राजेश पाडवी विजयी झाले असून त्यांनी काँग्रेसचे राजेंद्र कुमार गावित यांचा ५२ हजार मतांनी पराभव केला आहे. राजेश पाडवी यांनी दुसऱ्यांदा भाजप कडून उमेदवारी केली होती आणि दुसऱ्यांदा देखील ते मोठ्या मताधिक्याने विजयी झाली आहे . मी केलेल्या कामाच्या जोरावर तसेच महाराष्ट्र शासनाने राबवलेल्या योजनांचा मोठ्या प्रमाणावर मतदारांना लाभ झाल्याने माझा विजय निश्रि्चत झाला आहे .माझ्यावर दाखवलेल्या विश्र्वासामुळे मी मतदाराचे आभार मानतो असे आमदार राजेश पाडवी यांनी सांगितले.

### खामगावात आकाश फुंडकर यांचे जेसीबी वरुन गुलाल उधळत स्वागत



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव विधानसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार आकाश फुंडकर यांनी काँग्रेसचे दिलीप कुमार सानंदा यांचा पराभव करीत हॅट्रिक मारली आहे. एकच वादा आकाश दादा जय घोष करीत चौका चौकात जेसीबी लावून गुलाल व मुलांनी उधळण करीत आकाश फुंडकर यांचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांमध्ये मोठा जोष व उत्साह पाहायला मिळाला.

### चंद्रपूर मतदारसंघात किशोर जोरगेवार दुसऱ्यांदा विजयी




दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :**महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आज २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी झाली. चंद्रपूर विधानसभा मतदार संघामध्ये महाविकास आघाडीचे प्रवीण पडवेकर आणि महायुतीचे किशोर जोरगेवार यांच्यात दुहेरी लढत सुरु होती. त्यात सलग दुसऱ्यांदा महायुतीचे किशोर जोरगेवार यांचा दणदणीत विजय झाला. या वेळी जोरगेवार म्हणाले मी सर्वप्रथम चंद्रपूर जनतेच्या मनपूर्वक आभार मानतो त्यांनी भाजप महायुतीवर विश्र्वास ठेवत जिल्ह्यामध्ये सर्वाधिक मताने विजय केला आहे. हा माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या क्षण आहे. निश्रि्चतपणे राज्यात महायुतीच्या सरकार येईल या पुढच्या सर्व निवडणुका भारतीय जनता पार्टी महायुती जिंकणार असल्याचे प्रतिक्रिया किशोर जोरगेवार यांनी दिली आहे.

### वर्धा विधानसभेत महायुतीचे उमेदवार डॉ.पंकज भोयर यांची हॅट्रीक गुलाल उधळत कार्यकर्त्यांनी केला जल्लोष

**वर्धा/प्रतिनिधी :** वर्धा जिल्ह्यातील वर्धा विधानसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार आमदार डॉ.पंकज भोयर यांनी काँग्रेसचे उमेदवार शेखर शेंडे यांचा पराभव करीत हॅट्रिक मारली आहे. जयघोष करीत छत्रपती शिवाजी महाराज चौकातून विजय रॅली काढण्यात आली. कार्यकर्त्यांकडून आमदार पंकज भोयर यांचं जल्लोषात स्वागत करत जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांमध्ये मोठा जोश व उत्साह पाहायला मिळाला.



## काँग्रेसच्या बड्या नेत्यांचा पराभव

### बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण, माणिकराव ठाकरेंसह यशोमती ठाकूर यांना मतदारांचा धक्का

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची मतमोजणी पार पडत आहे. या निवडणूक निकालात भारतीय जनता पक्षाला मोठे यश मिळाले आहे. राज्यात महाविकास आघाडीचा सुपडा साफ झाल्याचे चित्र आहे. राज्यातील २८८ जागांपैकी २९९ जागांवर महायुतीचे उमेदवार आघाडीवर आहेत, तर महाविकास आघाडीला केवळ ५४ जागांवर विजय मिळवता आला आहे.

कोणता पक्ष किती जागांवर आघाडीवर ?

भाजपने १३३ , शिंदेंची शिवसेना ५६, अजित पवारांची राष्ट्रवादी ४० जागांवर आघाडी आहे. महाविकास आघाडीला विधानसभा निवडणुकीत मोठा फटका बसलाय. काँग्रेस पक्ष केवळ २० , शरद पवारांच्या राष्ट्रवादी १५ जागांवर आघाडीवर आहे. त्यामुळे महायुतीने महाविकास आघाडीला जोरदार धक्का दिलाय.




दरम्यान, या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला पराभवाला सामोरे >> पान २

## महाराष्ट्रात महायुतीची त्सुनामी, पंतप्रधान मोदींचा शब्द खरा ठरला!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीच्या त्सुनामीसमोर महाविकास आघाडीचा सुपडा साफ झाला आहे. सकाळी ११.३० वाजताच्या आकडेवारीनुसार महायुती २१७ जागांवर आघाडीवर तर महाविकास आघाडी ५३ जागांवर आघाडीवर आहे. याशिवाय इतर अपक्ष आणि छोटे पक्ष १८ जागांवर आघाडीवर आहेत. प्रत्येक पक्षाच्या आकडेवारीवर नजर टाकली तर भाजप १२५ जागांवरच्या आघाडीसह पहिल्या क्रमांकावर आहे, तर शिवसेना ५६, राष्ट्रवादी काँग्रेस ३६ जागांवर आघाडीवर आहेत. महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस २०, शिवसेना उद्धव ठाकरे १९ आणि शरद पवारांची राष्ट्रवादी १४ जागांवर आघाडीवर आहे.



महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचं मतदान व्हायच्या आधीच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नागरिकांना शपथविधीचं निमंत्रण दिलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी प्रचाराच्या शेवटच्या सभेत मी तुम्हाला शपथविधीचं निमंत्रण द्यायला आलो आहे, असं मोदी म्हणाले होते. मुंबईच्या शिवाजी पार्क मैदानात झालेल्या या सभेत मोदींनी भाजप आणि एनडीए सरकारच्या शपथविधीचं आमंत्रण दिलं होतं.

काय म्हणाले होते मोदी?

'आज मोदी का आले आहेत? मी तुमची मतं मागायला आलो आहे का? तुमचं प्रेम इतकं आहे, तुमचे आशिर्वाद एवढे आहेत, तुम्ही माझी झोळी भरून देता. पण मी आज तुम्हाला निमंत्रण द्यायला आलो आहे. २३ तारखेला निवडणुकीच्या निकालानंतर काहीच दिवसांमध्ये भाजप एनडीए सरकारचा शपथविधी सोहळा होईल. मी तुम्हाला सगळ्यांना शपथविधीचं निमंत्रण द्यायला आलो आहे', असं नरेंद्र मोदी मुंबईच्या शिवाजी पार्कवर झालेल्या सभेत म्हणाले होते.

# एक है तो 'सेफ' है ! मोदी है तो मुमकिन हैं !

## महायुतीच्या एकहाती वर्चस्वानंतर देवेंद्र फडणवीसांची पोस्ट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल हाती येऊ लागली आहेत. विधानसभा निवडणुकीत महायुतीने दणदणीत विजय मिळवल्याचे चित्र आहे. महायुतीने २२५ जागांवर आघाडी मिळवली आहे, तर महाविकास आघाडीला केवळ ५६ जागांवर आघाडी मिळवली आहे. दरम्यान, राज्यात महायुतीने विजयी आघाडी मिळवल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. 'एक है तो 'सेफ' है ! मोदी है तो मुमकिन हैं !',अशी पोस्ट देत देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

आत्तापर्यंत हाती आलेल्या कलानुसार, महायुतीने २२५ जागांवर आघाडी मिळवली आहे, तर महाविकास आघाडीला केवळ ५६ जागांवर आघाडी मिळवता आली आहे. भाजपने १३०, शिंदेंच्या शिवसेनेने ५६ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ३९ जागांवर आघाडी मिळवली आहे. तर दुसरीकडे महाविकास आघाडीत काँग्रेस पक्षाने २१, ठाकरेंच्या शिवसेनेने १८ तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीने १७ जागांवर आघाडी मिळवली आहे.



दरम्यान, महायुतीने मोठे यश मिळवल्यानंतर भाजप नेत्यांनी सेलीब्रेशन करण्यास सुरुवात केली आहे. माजी खासदार नवनीत राणा यांनी अमरावतीमध्ये तर माजी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुण्यात सेलिब्रेशनला सुरुवात केली आहे.

महायुतीत ज्या पक्षाला जास्त जागा मिळतील, त्याचा मुख्यमंत्री, असं आमचं काही ठरलं नव्हतं. प्रथम निवडणुकीच्या निकालाचे अंतिम आकडे येऊ दे. मग आम्ही तिन्ही पक्ष ज्याप्रमाणे जागावाटपाच्या चर्चेसाठी बसलो होतो, त्याप्रमाणे एकत्र बसू. पंतप्रधान मोदी, अमित शाह आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष जे.पी.नड्डा आणि तिन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते एकत्र बसून चर्चा करतील. आम्ही जशी निवडणूक लढलो तसा मुख्यमंत्रीपदाबाबतही एकत्र चर्चा करुन निर्णय घेऊ, अशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

विधानसभेच्या निकालानंतर देवेंद्र फडणवीस यांचे कट्टर समर्थक असलेल्या प्रवीण दरेकर यांनी एक वक्तव्य केले आहे. जी पार्टी मोठी आहे, त्यांचा मुख्यमंत्री होतो. भाजप १२५ जागांजवळ गेली आहे, त्यामुळं भाजपचा मुख्यमंत्री होणार आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील, असे प्रवीण दरेकर यांनी म्हटले होते.

## महायुतीला कौल...

अवघ्या महाराष्ट्राबरोबरच नाशिकच्या रामभूमीनेही आपला कौल महायुतीच्या पारड्यात टाकत जिल्ह्यातील १४ जागांवर महाविकास आघाडीचा धुव्वा उडवला. आमदारांनी जिल्ह्यात केलेल्या विकासकामांच्या जोडीला रा. स्व. संघाचे सूक्ष्म नियोजन आणि 'लाडकी बहीण योजने'चा महायुतीला मोठ्या प्रमाणावर फायदा झाल्याचे निवडणूक निकालांवरून स्पष्ट झाले आहे. अवघ्या महाराष्ट्राबरोबरच नाशिकच्या रामभूमीनेही आपला कौल महायुतीच्या पारड्यात टाकत जिल्ह्यातील १४ जागांवर महाविकास आघाडीचा धुव्वा उडवला. आमदारांनी जिल्ह्यात केलेल्या विकासकामांच्या जोडीला रा. स्व. संघाचे सूक्ष्म नियोजन आणि 'लाडकी बहीण योजने'चा महायुतीला मोठ्या प्रमाणावर फायदा झाल्याचे निवडणूक निकालांवरून स्पष्ट झाले आहे. लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशाने हुरळून गेलेल्या महाविकास आघाडीचा भ्रमाचा भोपळा नाशिकच्या जनतेने फोडला. 'परिवर्तनाची भूमी' म्हणून प्रसिद्ध असलेल्या नाशिकनगरीने मोठे उलटफेर करत महायुतीच्या पारड्यात अभूतपूर्व यश टाकले आहे. नाशिकमध्येदेखील महायुतीचा सुपडा साफ करू, अशा वल्गना करण्यात वेळ खर्ची घातला. याउलट महायुतीचे देशातील आणि राज्यातील नेते तळागाळात पोहोचत सुरू केलेल्या योजनांची माहिती पोहोचवत आपला प्रचार केला. त्याचबरोबर भाजपने सुरू केलेल्या 'उत्तर महाराष्ट्र मीडिया सेंटर'नेदेखील महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केलेल्या खोट्या आरोपांना नेत्यांच्या माध्यमातून उत्तर देण्याचे काम केले. महायुती सरकारने केलेल्या योजना सर्वसामान्य जनतेला भावल्याने नाशिक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर यश मिळाल्याचे समोर आलेल्या निकालांवरून स्पष्ट व्हावे. अपेक्षेप्रमाणे जिल्ह्यातील पहिला विजय निफाडचा लागला. येथे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार दिलीप बनकर यांनी उबाठा गटाच्या अनिल कदम यांना पराभवाची धूळ चारली. गेल्या अनेक वर्षांपासून नांदूरमध्यमेश्र्वर धरणाच्या गेटचा प्रश्र्न प्रलंबित होता. हा प्रश्र्न दिलीप बनकर यांनी सत्तेत आल्यानंतर मार्गी लावला. त्यामुळे निफाडकरांनी दुसर्यांदा दिलीप बनकर यांना निवडून दिले आहे. देवळालीमधूनही राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सरोज अहिरे यांनी दुसर्यांदा विजय मिळवला आहे. तिरंगी लढतीत अहिरे यांनी शिवसेनेच्या राजश्री अहिरराव आणि उबाठा गटाचे योगेश घोलप यांचा पराभव केला. सरोज अहिरे यांनी भगुरकरांना खराब रस्त्याच्या त्रासातून मुक्त केले. त्याची परतफेड करताना देवळालीच्या मतदारांनी 'विकासकन्या' सरोज अहिरे यांना दुसर्यांदा आमदारकी बहाल केली आहे. त्याचप्रमाणे, विधानसभेचा उपाध्यक्ष पुन्हा आमदार होत नाही. त्याचे राजकीय जीवन संपुष्टात येते, असा आजपर्यंतचा इतिहास राहिला आहे. मात्र, नरहरी झिरवाळ यांनी दिंडोरीत मोठा विजय मिळवत विधानसभेचा उपाध्यक्ष पराभूत होण्याची मालिका खंडित करण्याचा पराक्रमही केला. दिंडोरीचे सर्वच नेते झिरवाळ यांच्या विरोधात असतानाही ४० हजारांपेक्षा अधिक मतांनी त्यांनी विजय मिळवला आहे. दिलीप बोरसे यांनी दुसर्यांदा बागलाणमधून विजय मिळवला आहे. दिलीप बोरसे यांच्या झंझावातापुढे संपूर्ण बागलाणमधील शरद पवार गटाबरोबरच महाविकास आघाडी पालापाचोळ्यासारखी उडून गेल्याचे दिसून आले. राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ यांनीही आपला विजय साजरा केला आहे. सुरुवातीला पिछाडीवर असलेले भुजबळ सरतेशेवटी २६ हजार, ४०० मतांच्या आघाडीने निवडून आले. शरद पवार गटाच्या माणिकराव शिंदे यांचा छगन भुजबळ यांनी पराभव केला. विशेष म्हणजे, भुजबळ यांनी येवल्यातून लढावे, यासाठी माणिकराव शिंदेंनीच २० वर्षांपूर्वी पुढाकार घेतला होता. कायम दुष्काळ असलेल्या येवला मतदारसंघात १२ महिने शेतीसाठी पाणी भुजबळ यांनी उपलब्ध करून दिले. त्यामुळे मनोज जरांगे-पाटील यांनी येवल्यात सभा घेऊनही त्याचा कोणताही परिणाम येवल्याच्या मतदारांवर न झाल्याचे भुजबळ यांच्या विजयावरून लक्षात येते. चांदवड-देवळ्यामधून भाजपचे डॉ. राहुल आहेर यांनी विजय मिळवत मंत्रिपदाला गवसणी घातली आहे. प्रचारादरम्यान देवेंद्र फडणवीस यांनी राहुल आहेर यांना २० हजारांच्या आघाडीने निवडून दिले, तर कॅबिनेट मंत्रिपद देण्याचे आश्र्वासन दिले होते. आहेर यांच्या विजयाने चांदवडचे मंत्रिपद दृष्टिक्षेपात आले आहे. त्याचप्रमाणे नाशिक शहरातील मतदारांनी सलग तिसर्यांदा भारतीय जनता पक्षाला साथ दिली आहे. नाशिक पश्र्चिममधून सीमा हिरे, तर नाशिक मध्यमधून देवयानी फरांदे यांनी विजयाची हॅट्ट्रिक साजरी केली आहे, तर नाशिक पूर्वमधून राहुल ढिकले यांनी दुसर्यांदा, तर भाजपने तिसर्यांदा विजय साजरा केला आहे. २००९ सालच्या निवडणुकीत नाशिक पूर्वमधून बाळासाहेब सानप विजयी झाले होते. निवडणूक सुरू होण्याच्या आधीपासूनच नाशिक पूर्वमध्ये भाजपचे राहुल ढिकले यांचा विजय निश्र्चित मानला जात होता. कळवण-सुरगाणा विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे नितीन पवार यांनी माकपचे जिवा पांडू गावित यांचा पराभव केला, तर मालेगाव बाह्य मतदारसंघातून शिंदेंच्या शिवसेनेचे दादा भुसे यांनी सलग चौथ्यांदा विजय संपादन करण्याचा पराक्रम केला आहे. उबाठा गटाचे उमेदवार अद्वय हिरे तिसर्या क्रमांकावर राहिले, तर मालेगावला लागून असलेल्या नांदगाव मतदारसंघातून शिंदेंच्या शिवसेनेचे सुहास कांदे यांनी केलेल्या विकासकामांच्या जोरावर विजयाला गवसणी घातली. नांदगावमध्ये तर उबाठा गटाचा उमेदवार चौथ्या क्रमांकावर फेकला गेला. इगतपुरीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे हिरामण खोसकर यांनी काँग्रेसच्या गडाला सुरुंग लावत विजय मिळवला. काँग्रेसमधून उमेदवारीची निश्र्चिती नसल्याने खोसकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस-अजित पवार गटात पक्षात प्रवेश करत विजय मिळवला, तर मालेगाव मध्यतून 'एमआयएम'चे मुफ्ती मोहम्मद इस्माईल विजयी झाले. त्यांनी अपक्ष आसिफ शेख रशीद यांचा पराभव केला, तर सिन्नरमधून माणिकराव कोकाटे यांनी उबाठा गटाच्या उदय सांगळे यांना धूळ चारली. एकूणच, केलेल्या विकासकामांच्या जोरावर निवडणुकीला सामोरे जाणार्या महायुतीला लाडक्या बहिणींनी भरभरून मतदान केल्याने 'एमआयएम' वगळता, सर्व १४ जागांवर महायुतीने विजय मिळवला आहे.

# देवेंद्र फडणवीसांची हॅटट्रिक, सलग तिसऱ्यांदा शतकेपार झेंडा; भाजप विजयाचा नवा रेकॉर्ड

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : भाजप नेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या ५ वर्षात राज्याच्या राजकारणात अनेक स्थित्यंतरे पाहिली आहेत. कारण, गत २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपला १०५ जागांवर विजय मिळूनही त्यांना विरोधात बसावे लागले होते. मात्र, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत फडणवीसांच्या नेतृत्वात भाजपने मोठा विजय मिळवला आहे. त्यामुळे, महाराष्ट्रातील राजकारणाच्या इतिहासात एक नवा अध्याय भाजपने त्यांच्या नेतृत्वात लिहिल्याचे पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, भाजपने देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वात सगल तीन टर्म शतकेपार झेंडा फडकवला आहे. फडणवीसांच्या नेतृत्वात भाजपाला २०१४, २०१९ आणि २०२४ या कालावधीत सलग ३ वेळा स्पष्ट बहुमत मिळाले आहे. तर, २०१४ मध्ये भाजपला १२३ जागा, २०१९ मध्ये १०५ आणि २०२४ मध्ये १०० पेक्षा जास्त जागांवर भाजपचा विजय झाल्याचे दिसत आहे. त्यामुळे,आजच्या विजयानंतर भाजपने नवा रेकॉर्ड प्रस्थापित केलाय. विशेष म्हणजे सलग ३ वेळा भाजपाला शंभरीपार नेण्याचा पराक्रम आजपर्यंत महाराष्ट्रात कोणत्याच पक्षाला आणि नेतृत्वाला जमलेला नाही. त्यामुळे, हे यश महत्वाचे मानले जाते.



देवेंद्र फडणवीस २०१४ ला राज्याचे मुख्यमंत्री होते, पण, २०१९ ला उद्धव ठाकरेंनी राजकीय खेळी करत मुख्यमंत्रीपद हिसकावून घेतले. त्यानंतर, फडणवीसांनी पक्षाला पुन्हा उभारी देत स्वत:तला आक्रमक विरोधी पक्षनेता म्हणून महाराष्ट्रापुढे नेलं. पुन्हा राजकीय समीकरणे जुळवून आणत आणि दोन पक्षात फूट पाडून राज्यात महायुतीचे सरकार आणले. मात्र, पक्षाच्या आदेशानुसार त्यांना उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे लागले होते. त्यानुसार, त्यांनी सरकारमध्ये सहभागी होत भाजपला पुन्हा एकसंघ बांधण्याचा प्रयत्न केला.

लोकसभेतील दारुण पराभवानंतर अख्ख्या महाराष्ट्रातील कार्यकर्ता खचला होता. त्यावेळी केंद्रीय नेतृत्वाने जागावाटप ते प्रचारयंत्रणा संपूर्ण अधिकार फडणवीसांना देत विश्वास ठेवला. पक्षनेतृत्वाच्या या संधीचे सोनं करुन दाखवत देवेंद्र फडणवीसांनी भाजपला मोठा विजय मिळवून दिला. यंदाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीतील सर्व पक्षांनी आणि त्यांच्या नेत्यांनी देवेंद्र फडणवीस यांना टार्गेट केले होते. आजच्या निकालामुळे पुन्हा एकदा भाजपचं राज्यातील नेतृत्व हे देवेंद्र फडणवीस हेच असल्याचे दिसून आले. दरम्यान, महाराष्ट्रात२०१४ ते २०१९ या कालखंडात पायाभूत विकासाला मोठी चालना मिळाली होती. त्या काळातील अनेक प्रकल्प २०२२ ते २०२४ या कालखंडात पूर्णत्वास गेले. भाजप नेतृत्वात देवेंद्र फडणवीस यांचा आक्रमक हिंदूत्त्ववादी चेहराही या विधानसभा निवडणुकीने अनुभवला. त्यामुळेच, देवेंद्र फडणवीस यांनी विजयी झाल्यानंतर एक है तो सेफ है... असे ट्विट करत विजयाचं निरीक्षणच एकप्रकारे नोंदवल्याचे दिसून येत आहे.

## राजकारणात 'हे' कधीच जमलं नसतं

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : आपल्या स्पष्टवक्तेपणानं बॉलिवूडमध्ये ओळखली जाणारी रविना टंडनचा सध्या एक जूना व्हिडीओ सध्या व्हायरल होतोय. यात रविनाला राजकारणाची ऑफर आली होती पण ती या जगात का येऊ शकली नाही याचं कारण सांगताना दिसतेय. अक्षय कुमार आणि रविना टंडन या दोघांना बॉलिवूडमधलं सजग जोडपं म्हणून ओळखलं जातं.आपल्या स्पष्ट बोलण्यामुळं आणि आपला स्टँड भीड न बाळगता चाहत्यांना सांगायला रवीना ओळखली जाते.तिच्या प्रामाणिक पणाच्या सवयीमुळे आणि चुकीच्या गोष्टी सहन होत नसल्यानं राजकारणात राहणं आव्हानात्मक झालं असतं. असं ती म्हणते. व्हायरल होणाऱ्या या व्हिडिओमध्ये रवीना म्हणतेय की ज्या दिवशी मी राजकारणात प्रवेश करेन तेव्हा माझ्या अशा वागणुकीमुळे कोणीतरी मला गोळ्या घालेल.

काय म्हणतेय रविना या व्हिडिओत?

रविनाचा एक जूना व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलाच फिरतोय. यात ती मी जर राजकारणात आले तर मला कोणीतरी गोळी मारेल.



कारण मी खोट्याला खऱ्यात बदलू शकत नाही. मला एक गोष्ट फार अवघड गेली असती की जेव्हा मला एखादी गोष्ट पटत नाही किंवा करायची नसते तेंव्हा ते लगेच माझ्या चेहऱ्यावर येतं. मी लगेच त्या गोष्टीवर भांडायला लागते. आजकालच्या जमान्यात खरेपणा ही पॉलिसी नाही. त्यामुळं जो कोणी मला राजकारणात यायला सांगतं त्याला मी सांगते की मी तिथे आले तर माझी एवढ्या लवकर हत्या होईल की सगळंच अवघड होईल.

या चित्रपटात झळकली होती रविना

रवीना टंडनने १९९१ मध्ये पत्थर के फूल या हिट चित्रपटाद्वारे पदार्पण केले. ती मोहरा, दिलवाले, आतिश आणि लाडला सारख्या चित्रपटांमधील अभिनयासाठी ओळखली जाते.त्या वर्षातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांपैकी होते.ती शेवटची 'पटना शुक्ला' मध्ये वकिलाच्या भूमिकेत दिसली होती. संजय दत्तसोबत 'घुडछडी' या चित्रपटातही ती झळकली होती.




पान १ वरून...

## काँग्रेसच्या बड्या नेत्यांचा पराभव

जावे लागलेच आहे. पण विशेष म्हणजे काँग्रेसच्या फायरब्रँड नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागलाय.

पृथ्वीराज चव्हाण यांचा पराभव

माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांचा पराभव झालाय. ते कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे पृथ्वीराज चव्हाण विरुद्ध भाजपचे अतुल भोसले असा सामना रंगला होता. या लढतीत अतुल भोसले यांनी पृथ्वीराज चव्हाण यांचा दारुण पराभव केला आहे. कराड दक्षिणमध्ये १७ व्या फेरीनंतर अतुल भोसले यांनी ३८ हजार मतांचा लिड मिळवला होता. पृथ्वीराज चव्हाण यांना हा लीड तोडण्यात अपयश आलंय.

यशोमती ठाकूर यांचाही पराभव

माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनाही पराभवाचा सामना करावा लागला आहे. तिवसा विधानसभा मतदारसंघात भाजपने यशोमती ठाकूर यांच्याविरोधात राजेश वानखेडे यांना उमेदवारी दिली होती. राजेश वानखेडे यांच्याकडे २१ फेऱ्यांनंतर ८१९५ मतांचा लीड होता. अखेर आता यशोमती ठाकूर यांचा पराभव झाल्याचे निश्र्चित मानले जात आहे.

बाळासाहेब थोरात यांचा देखील पराभव

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांना देखील पराभवाचा सामना करावा लागला आहे. बाळासाहेब थोरात सातत्याने या मतदारसंघातून निवडून आले आहेत. मात्र, यावेळी मतदारांनी त्यांचा आमदार बदलला आहे. बाळासाहेब थोरात यांच्याविरोधात शिंदेंच्या शिवसेनेकडून अमोल खटाळ यांना उमेदवारी देण्यात आली होती. अमोल खटाळ यांनी थोरातांचा १० हजार ५६० मतांनी पराभव केलाय.

# धुळे जिल्ह्यात महायुतीचा बोलबाला, पाचही जागांवर दणदणीत विजय

**दैनिक आपला विदर्भ**

**धुळे/प्रतिनिधी** :धुळे जिल्ह्यात पाच विधानसभा मतदारसंघ येतात. यात धुळे शहर, धुळे ग्रामीण, शिंदखेडा शिरपूर आणि साक्री यांचा समावेश होतो. पाचही विधानसभा मतदारसंघात शिंदखेडा, शिरपूर या ठिकाणी भाजपाची तर साक्री विधानसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार २०१९ च्या निवडणुकीत विजयी झाले होते तर धुळे ग्रामीणमधून काँग्रेसने आणि धुळे शहर विधानसभा मतदारसंघातून एमआयएमने विजय प्राप्त केला होता. धुळे जिल्ह्यात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला दोन जागा काँग्रेसला एक एमआयएमला एक आणि अपक्ष एक असे विजयी झाले होते. यंदाच्या निवडणुकीत कोण बाजी मारणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. आता विधानसभा निवडणुकीचा निकाल समोर यायला सुरुवात झाली आहे. जाणून घेऊयात धुळ्यातील पाच



विधानसभा मतदारसंघात जनतेचा कौल कुणाला?

**धुळे शहर : अनुप अग्रवाल, भाजप विजयी**

धुळे शहरात भाजपाचे अनुप अग्रवाल, शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे माजी आ. अनिल गोटे आणि आणि एमआयएमचे आ. फारूक शाह तसेच समाजवादी पार्टीचे इर्शादभाई जहागिरदार रिंगणात असल्याने याठिकाणी भाजपा, शिवसेना उध्दव ठाकरे गट, एमआयएम आणि समाजवादी पार्टी अशी चौरंगी लढत झाली.

**धुळे ग्रामीण : राम भदाणे भाजप विजयी**

धुळे ग्रामीण मतदार संघात काँग्रेसचे आ. कुणाल पाटील विरूध्द भाजपाचे राम भदाणे या दोन प्रमुख पक्षात लढत होईल असे वाटत होते. मात्र शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे हिलाल माळी यांनी आपली अपक्ष उमेदवारी कायम ठेवल्याने याठिकाणी महाविकास आघाडीत बंडखोरी झाली आहे. परिणामी काँग्रेस, भाजपा आणि अपक्ष अशी तिरंगी लढत पहायला मिळाली.

**शिंदखेडा : जयकुमार रावल, भाजप विजयी**

शिंदखेडा मतदार संघात भाजपाचे आ. जयकुमार रावल आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे संदीप बेडसे यांच्यात लढत होण्याची शक्यता वर्तविली जात होती. मात्र काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर यांनी अपक्ष उमेदवारी कायम ठेवल्याने याठिकाणी महाविकास आघाडीत बंडखोरी झाली. परिणामी याठिकाणी भाजपा, राष्ट्रवादी शरद पवार पक्ष आणि अपक्ष अशी तिरंगी लढत झाली होती.

**शिरपूर : कांशीराम पावरा, भाजप विजयी**

शिरपूरमध्ये भाजपाचे आ. काशिराम पावरा आणि भारतीय कम्युनिष्ट पार्टी ऑफ इंडीयाचे कॉ. बुधा पावरा यांच्यासह राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे डॉ. जितेंद्र ठाकूर रिंगणात आहेत. परिणामी याठिकाणी भाजपा, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया आणि अपक्ष असा तिरंगी सामना झाला.

**साक्री : मंजुळा गावित, शिवसेना शिंदे गट विजयी**

साक्रीत शिवसेना शिंदे गटाच्या आ. मंजुळा गावित, काँग्रेसचे प्रविण चौरे यांच्यासह भाजपाचे बंडखोर उमेदवार मोहन सुर्यवंशी रिंगणात होते. याठिकाणी महायुतीत बंडखोरी झाल्याचे दिसत असून शिवसेना शिंदे गट, भाजपा आणि अपक्ष अशी तिरंगी लढत याठिकाणी पहावयास मिळाली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# जिल्ह्यात चार जागांवर भाजपचा बोलबाला

## भाजप ४ तर शिंदे शिवसेना, रा.कॉं. व उबाठा शिवसेनेला प्रत्येकी एक जागा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी** : जिल्ह्यातील सात मतदार संघात दि.२० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडले असून दि. २३ नोव्हेंबर रोजी कडक पोलीस बंदोबस्तात मतमोजणी पूर्ण करण्यात आली. या मतामेजणीत अंतिम निकाल हाती आले असून जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाने ४ जागांवर विजय संपादन केला आहे. तर शिवसेना १, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना १ आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसला १ जागेवर यश मिळाले आहे. या निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याहस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. बुलढाणा जिल्ह्यात एकूण ७ विधानसभा मतदार संघ असून यामध्ये चार जागेवर भाजप तर उबाठा एक, शिंदे शिवसेना एक व रा. कॉं. एक उमेदवार विजय संपादन केला आहे. मलकापूर



आकाश फुंडकर | संजय गायकवाड | संजय कुटे | श्वेताताई महाले | मनोज कायंदे | सिध्दार्थ खरात

विधानसभा मतदार संघात भारतीय जनता पार्टीचे चेनसुख मदनलाल संचेती यांना एकूण १ लाख ९९२१ मते मिळाली असून त्यांचा २६३९७ मताने विजय झाला आहे. तर कॉंग्रेसचे राजेश पंडीतराव एकडे यांना दोन नंबरची ८३५२४ मते मिळाली आहेत. तर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार मोहम्मद जमीरुदिन मोहम्मद साबीरउदीन यांना तिसऱ्या नंबरची ९३१३ मते मिळाली आहेत.बुलढाणा विधानसभा मतदार संघात शिवसेनेचे उमेदवार संजय रामभाऊ गायकवाड यांना एकूण ९१ हजार ६६० मते मिळाली असून त्यांचा ८४१ मताने विजय झाला आहे. तर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवेसनेचे उमेदवार जयश्री सुनिल शेळके यांना दुसऱ्या नंबरची ९० हजार ८१९ मते मिळाली आहेत. तर तिसऱ्या नंबरची मते वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार प्रशांत उत्तम वाघोदे यांना ७१४६ मते मिळाली आहेत. चिखली विधानसभा मतदार संघात भारतीय जनता पक्षाचे उमेदवार सौ. श्वेता विद्याधर महाले यांना १ लाख ९२१२ मते मिळाली असून त्यांचा ३२०१ मताने विजय झाला आहे. तर दुसऱ्या क्रमांकाची १ लाख ६०११ मते मिळाली आहेत. तर तिसऱ्या क्रमांकाची मते महाराष्ट्र नवनिर्माण सेनचे उमेदवार गणेश उर्फ बंडू श्रीराम बरबडे यांना १३२३ मते मिळाली आहेत. सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे उमेदवार मनोज देवानंद कायंदे यांना एकूण ७३ हजार ४१३ मते मिळाली असून त्यांचा ४६५० मताने विजय झाला आहे. तर दुसऱ्या क्रमांकाची मते शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे यांना ६८ हजार ७६३ मते मिळाली आहेत. तर तिसऱ्या क्रमांकाची ६० हजार ६३५ मते शिवसेनचे उमेदवार डॉ. शशिकांत नरसिंगराव खेडेकर यांना मिळाली आहेत. मेहकर विधानसभा मतदार संघात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनचे उमेदवार सिद्धार्थ रामभाऊ खरात यांना एकूण १ लाख ४२४२ मते मिळाली असून त्यांचा ४८१९ मताने विजय झाला आहे. तर दुसऱ्या क्रमांकाची मते शिवसेनेचे उमदेवार संजय भास्कर रायमुलकर यांना ९९ हजार ४२३ मते मिळाली आहेत. तर तिसऱ्या क्रमांकाची २०५४ मते वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांना मिळाली आहेत. खामगाव विधानसभा मतदार संघाचे भारतीय जनता पक्षाचे उमेदवार आकाश पांडूरंग फुंडकर यांना एकूण १ लाख १० हजार ५९९ मते मिळाले असून त्यांचा २५ हजार ४७७ मताने विजय झाला आहे. तर दुसऱ्या क्रमांकाची मते कॉंग्रेसचे उमेदवार राणा दिलीपकुमार गोकुळ सानंदा यांना ८५ हजार १२२ मते मिळाली आहेत. तर तिसऱ्या क्रमांकाची २६ हजार ४८२ मते वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार देवराव भाऊराव हिवराळे यांना मिळाली आहेत. व जळगाव जामोद विधानसभा मतदार संघाचे भारतीय जनता पक्षाचे उमेदवार संजय श्रीराम कुटे यांना एकूण १ लाख ७३१८ मते मिळाली असून त्यांचा १८ हजार ७७१ मताने विजय झाला आहे. दुसऱ्या क्रमांकाची ८८ हजार ५४७ मते कॉंग्रेसचे उमेदवार डॉ. स्वाती संदीप वाकेकर यांना मिळाली आहेत. व तिसऱ्या क्रमांकाची १७ हजार ६४८ मते वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. प्रवीण जनार्धन पाटील यांना यांना मिळाली आहेत.

## महत्त्वाचे...

### नांदेडमध्ये महायुतीच्या विजयाचा जल्लोष साजरा



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : नांदेडच्या सर्वच्या सर्व जागा महायुतीने जिंकल्या असून मागील अडीच वर्षाच्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या कामाची पावती जनतेनी दिली आहे. त्यामुळे मी जनतेचे आभार मानतो अशा शब्दात शिवसेनेचे आमदार हेमंत पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. आम्हाला अडचणीत आणण्यासाठी विरोधकांनी जाणूनबुजून काही जागांवर आपले उमेदवार उभे केले होते, परंतु जनतेच्या हे लक्षात आल्यामुळे त्यांनी महायुतीच्या बाजूने कौल दिला आहे अशी प्रतिक्रिया हेमंत पाटील यांनी दिली आहे.

### भिवंडी ग्रामीणमध्ये शिवसेनेचे शांताराम मोरे विजयी; कार्यकर्त्यांकडून जल्लोष साजरा



दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी** : सर्व महायुतीचे कार्यकर्ते आमचे नेते प्रकाश पाटील साहेब आणि श्रमजीव संघटनेचे कार्यकर्ते देवा ग्रुपचे कार्यकर्ते सर्व कार्यकर्ते या मतदारसंघांमध्ये महायुतीच्या सर्व कार्यकर्ते म्हणजे खूप मताने निवडून द्यायचं त्याच्यामुळे सर्व कार्यकर्त्यांच्या घाम मेहनतीवर आज भिवंडी ग्रामीणमध्ये हे महायुतीचा आमदार म्हणून मला या ठिकाणी सर्व मतदारांनी निवडून दिलेला असून मी त्यांचे आभार मानतो अशी प्रतिक्रिया शांताराम मोरे यांनी दिली आहे. देवेंद्र फडणीस,अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली जे काय राज्यांमध्ये अडीच वर्षात घेतलेले जे निर्णय योग्य असून मुख्यमंत्री लाडकी बहीण अतिशय लोकप्रिय असलेली योजना माय भगिनीने भावाच्या प्रती मतदान केले आहे. या दृष्टिकोनातून त्यांनी त्यांना मतदान केले आहे लाडका भाऊ आहे ज्येष्ठ नागरिक आहे यांच्यासाठी ही योजना आहे. शांताराम मोरेच्या रूपाने महायुतीला ही आमदारकी पाच वर्षासाठी आणि अतिशय पारदर्शक पाच वर्षांमध्ये कुठल्याही या विधानसभेच्या आणि जे काय काम होईल ते पारदर्शक होईल नव्हे तर हे जे घटक पक्ष आहेत महायुतीच्या माध्यमातून महायुतीचा शिवसेनेचा नेता आहे आदर्श मुख्यमंत्री असून अडीच वर्षे काम केले असून एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हावा अशी माझी इच्छा आहे अशी प्रतिक्रिया शिवसेनेचे उपनेते प्रकाश पाटील यांनी दिली आहे.

### महाराष्ट्रातील फायरब्रँड लढत! शेवटच्या क्षणी पक्ष बदलून मंदा म्हात्रेंविरोधात लढणाऱ्या भाजपच्या बड्या नेत्याच्या मुलाचा पराभव

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :महाराष्ट्रातील फायरब्रँड लढत नवी मुंबईतील बेलापूर मतदार संघात पहायाला मिळाली. भाजपने तिकीट नाकारल्याने भाजपच्या एका बड्या नेत्याच्या मुलाने शेवटच्या क्षणी पक्ष बदलून बंडखोरी केली. भाजपच्या उमेदवार मंत्रा म्हात्रे यांच्या विरोधात निवडणून लढवली. मात्र, सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले आहेत. बेलापूर विधानसभा म तदारसंघातून भाजपच्या मंदा म्हात्रे विजयी झाल्या आहेत.



नवी मुंबईतल्या बेलापूर विधानसभा मतदारसंघात लक्षवेधी लढत झाली. फायरब्रँड नेत्या मंदा म्हात्रेंना पुन्हा एकदा तिकीट देऊन भाजपनं बेलापूरातून मैदानात उतरवलंय. भाजपनं पुन्हा एकदा मंदा म्हात्रेंना संधी दिल्याने संदीप नाईक नाराज झाले. भाजपला रामराम ठोकून संदीप नाईकांनी तुतारी हाती घेतली आणि ते निवडणुकीच्या रिंगणात उतरले.

मंदा म्हात्रे यांना भाजपकडून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर बेलापूरमध्ये बंडाची ठिणगी पडली. इच्छुक असलेल्या संदीप नाईकांनी भाजपला रामराम करून तुतारी हाती घेतली. तब्बल २५ नगरसेवकांना घेऊन संदीप नाईकांनी तुतारी हाती घेतली. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने संदीप नाईक यांना उमेदवारी दिली. संदीप नाईकांनी भाजपकडे बेलापूरमधून उमेदवारी मागितली होती. भाजपनं गणेश नाईकांना ऐरोली मतदारसंघातून उमेदवारी दिली. मात्र बेलापूरमधून मंदा म्हात्रेंना तिकीट दिलं. त्यामुळे नाराज संदीप नाईकांनी शरद पवारांसोबत जाण्याचा निर्णय घेतला. बेलापूर विधानसभा मतदार संघतून मंदा म्हात्रे ४१५ मतांनी विजयी झाल्या आहेत.

# साताऱ्याचा बालेकिल्ला महायुतीच्या ताब्यात

## महाविकास आघाडीचा मविआला ८-० असा क्लीन स्वीप

दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी** : जिल्ह्यात विधानसभेचे ८ म तदारसंघ आहेत. फलटण, वाई, कोरेगाव,माण, कराड उत्तर, कराड दक्षिण, पाटण आणि सातारा या मतदारसंघांचा सम ावेश होतो. सातारा जिल्ह्यातील ८ जागांसाठी मतदान पार पडलं आहे. काही महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या म तदानाची तुलना केली असता साताऱ्यातील सर्व मतदारसंघांम ध्ये मतदानाचा टक्का वाढलेला आहे.सातारा जिल्ह्यात एकूण आठ मतदारसंघांमध्ये ७१.९५ टक्के मतदान झालं आहे.वाढलेलं मतदान कुणाच्या बाजूनं जाणार याकडे सर्वाचं लक्ष लागलं आहे. सातारा जिल्ह्यातील आठ म तदारसंघात महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत.

सातारा जिल्ह्यातील विजयी उमेदवारांची नावं : फलटण : सचिन पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेस, वाई : मकरंद पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेस, कोरेगाव: महेश शिंदे,शिवसेना, माण : जयकुमार गोरे, भाजप, कराड उत्तर : मनोज घोरपडे, भाजप , कराड दक्षिण : अतुल भोसले, भाजप, पाटण : शंभूराज देसाई, शिवसेना, सातारा : शिवेंद्रराजे भोसले, भाजप

फलटण विधानसभा म तदारसंघ लोकसभेला माढा मतदारसंघात येतो. फलटणम ध्ये विधानसभेला २४१३७६ मतदान झालं आहे. फलटणला



राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून सचिन पाटील विरुद्ध राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून आमदार दीपक चव्हाण निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

वाई विधानसभा मतदारसंघ सातारा लोकसभा मतदारसंघात येतो. विधानसभा निवडणुकीत २३४५४४ इतकं मतदान झालं आहे. वाईची लढत तिरंगी झाली आहे. या ठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून मकरंद पाटील रिंगणात असून त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या अरुणादेवी पिसाळ निवडणूक लढवत आहेत. अपक्ष उमेदवार म्हणून पुरुषोत्तम जाधव रिंगणात आहेत.

कोरेगाव मतदारसंघात विधानसभा निवडणुकीत इथं मतांची टक्केवारी वाढलेली आहे. कोरेगावात २४९३११ इतकं मतदान झालं आहे. इथं शिवसेना आमदार महेश शिंदे यांच्या विरोधात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे विधानपरिषदेचे आमदार शशिकांत शिंदे यांचं आव्हान आहे.

माण विधानसभा म तदारसंघात लोकसभेच्या तुलनेत विधानसभेला म तदानात वाढ झाली आहे. माण विधानसभा मतदारसंघात २५९६०३ इतकं मतदान झालं आहे. माण विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार जयकुमार गोरे भाजपकडून लढत असून त्यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रभाकर घार्गे यांचं आव्हान आहे.

कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात २८८८३० इतकं मतदान झालं आहे. या ठिकाणी विद्यमान आमदार बाळासाहेब पाटील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून रिंगणात आहेत. त्यांना भाजपच्या मनोज घोरपडे यांचं आव्हान आहे.

कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघात कॉंग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण आणि भाजप नेते अतुल भोसले यांच्यात तिसऱ्यांदा लढत होत आहे. यापूर्वी दोनवेळा पृथ्वीराज चव्हाण यांनी अतुल भोसले यांचा पराभव केला होता. यावेळी या मतदारंसघात २४०७४३ इतके मतदान झाले आहे.

पाटण विधानसभा म तदारसंघात तिरंगी लढत होत आहे. पाटणमध्ये शिवसेनेकडून शंभूराज देसाई, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून हर्षद कदम आणि अपक्ष सत्यजितसिंह पाटणकर रिंगणात आहेत. विधानसभेला इथं २२९४८३ मतदान झाले आहे.

सातारा विधानसभा म तदारसंघात शिवेंद्रराजे भोसले भाजपकडून निवडणूक लढवत आहेत. तर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून अमित कदम विधानसभेच्या रिंगणात आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी २१७७०० इतकं मतदान झालं आहे.

सातारा जिल्ह्यातील २०१९ मधील विजयी उमेदवारांची नावं :

फलटण : दीपक चव्हाण (राष्ट्रवादी कॉंग्रेस)

वाई : मकरंद पाटील (राष्ट्रवादी कॉंग्रेस)

कोरेगाव: महेश शिंदे (शिवसेना)

माण : जयकुमार गोरे (भाजप)

कराड उत्तर : बाळासाहेब पाटील (राष्ट्रवादी कॉंग्रेस)

कराड दक्षिण : पृथ्वीराज चव्हाण (कॉंग्रेस)

पाटण : शंभूराज देसाई (शिवसेना)

# मुक्ताईनगरमध्ये खडसेंना धक्का! शिंदे गटाने उधळला गुलाल, रोहिणी खडसेंचा दुसऱ्यांदा पराभव

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ खऱ्या अर्थाने रंजक ठरली आहे. जळगाव जिल्ह्यातील मुक्ताई नगर हा मतदारसंघ सर्वाच चर्चेचा विषय होता. राज्यातील २८८ जागांपैकी मुक्ताई नगर मतदारसंघ हा राज्याच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान आहे. ही जागा दीर्घकाळापासून भाजपच्या ताब्यात आहे. यंदा विधानसभा निवडणुकीत एकनाथ खडसे यांना पुन्हा एकदा धक्का बसला आहे. एकनाथ खडसे यांच्या कन्या राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या रोहिणी खडसे यांचा दुसऱ्यांदा पराभव झालाय. तर शिंदे गटाचे चंद्रकांत पाटील यांनी हा गड राखला आहे.

जळगाव जिल्ह्यात मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघ हा सर्वात चर्चेतला मतदारसंघ आहे. मागील काही वर्ष भाजपच्या तिकिटावर एकनाथ खडसे येथून निवडून आले होते. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या रोहिणी खडसे यांच्या विरोधात असलेले शिंदे गटाचे चंद्रकांत पाटील यांनी त्यांचा पराभव केला आहे. रोहिणी खडसे यांचा हा दुसऱ्यांदा पराभव झाला आहे. २०१९ च्या निवडणुकीत देखील दोन्ही उमेदवार आमने- सामने होते. त्यावेळी देखील रोहिणी खडसे यांचा पराभव झाला होता. यामुळे यंदाच्या निवडणुकीत काहीतरी वेगळे चित्र पाहायला मिळेल असे बोलले जात होते. मात्र मतदारांनी पुन्हा एकदा चंद्रकांत पाटील यांच्यावर विश्वास दाखविला आहे.

महाराष्ट्रातील मुक्ताईनगर विधानसभा जागा ही भाजपचा बालेकिल्ला असलेल्या राज्यातील एक जागा मानली जाते. येथे भाजपचे सुप्रसिद्ध नेते एकनाथराव गणपतराव खडसे म्हणजेच एकनाथ खडसे यांनी सलग ६ वेळा निवडणूक जिंकली आहे. २०१९ च्या निवडणुकीत भाजप आणि एकनाथ खडसे यांचा हा विजय रथ थांबला. २०१९ च्या निवडणुकीतील दारूण पराभवानंतर एकनाथ खडसे यांनी भाजपला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादीत प्रवेश केला.

मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघ राज्यात नावाने कमी आणि एकनाथ खडसे यांच्या नावाने जास्त ओळखला जातो. १९९० पासून भाजपला या जागेवर कधीही पराभवाचा सामना करावा लागला नाही. १९९० ते २०१४ पर्यत या जागेवर फक्त एकनाथ खडसे निवडणूक लढवत आहेत आणि जिंकत आहेत. पण, २०१९ च्या निवडणुकीत असे काही घडले, ज्याची खडसेंनी कल्पनाही केली नसेल. या निवडणुकीत खडसे यांची कन्या रोहिणी एकनाथ खडसे यांनी भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती. त्यांच्या विरोधात चंद्रकांत निंबा पाटील यांनी अपक्ष अर्ज दाखल केला. या निवडणुकीत चुरशीची लढत असतानाही चंद्रकांत निंबा पाटील यांनी रोहिणी यांचा १,९५७ मतांनी पराभव केला.

# राज्यात पवार पॅटर्न फेल, थोरल्या पवारांनी राज्य पिंजून काढले पण तुतारी वाजलीच नाही


दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : गेल्या अनेक दिवसांपासून राज्यातील चर्चेचा केंद्रबिंदू ठरलेल्या विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. या निवडणुकीत भाजप आणि महायुतीच्या त्सुनामीपुढे महाविकास आघाडी अक्षरश: भुईसपाट झाल्याचे चित्र दिसत आहे. निवडणुकीपूर्वी महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये चुरशीची लढत होईल, अशी चर्चा होती. मात्र, ही अपेक्षा सपशेल फोल ठरली आहे. यंदाच्या निवडणुकीत शरद पवार यांनी महायुती आणि विशेषत: भाजपच्याविरोधात केलेला प्रचार हा, चर्चेचा विषय ठरला होता. शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी राज्यभरात ६९ सभा घेतल्या होत्या. त्यांच्या पश्चिम महाराष्ट्रातील सभांना मोठी गर्दी पाहायला मिळाली होती. या निवडणुकीत शरद पवार यांची भाषणंही प्रचंड गाजली होती. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात तुतारीचे उमेदवार मोठ्याप्रमाणावर निवडून येतील, असा अंदाज बांधला जात होता. परंतु, हा अंदाज सपशेल फोल ठरला.

गेल्या पाच वर्षामध्ये शरद पवार हे महाविकास आघाडीचा प्रमुख चेहरा होते. उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या करिष्म्यामुळे मविआला विजय मिळेल, असे अंदाज वर्तविण्यात आले होते. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत दोन्ही नेत्यांनी राज्यभरात सभा घेतल्या होत्या. शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपचे अनेक बडे नेते गळाला लावले होते. त्यांनी जातीय आणि राजकीय समीकरणांचा विचार करुन अनेक ठिकाणी उमेदवार हेरले होते. विधानसभेच्या प्रचारात शरद पवार यांनी भाजपचा 'बटेंगे तो कटेंगे' हा अजेंडा खोडून काढला होता. याशिवाय, लाडक्या बहीणमुळे महायुतीला मिळणारी सहानुभूतीही शरद पवार यांनी महिला अत्याचाराचा मुद्दा उपस्थित करत कमी करण्याचा प्रयत्न करत होता. शरद पवार यांच्या सभांमधील सोयबीन आणि कपाशीला मिळणारा कमी भावाचा मुद्दाही प्रभावी ठरेल, असे वाटत होते. मात्र, प्रत्यक्ष निकाल पाहता शरद पवार यांची रणनीती आणि करिष्मा पूर्णपणे फेल गेल्याचे दिसत आहे.

शरद पवारांच्या इमेजला धक्का?

आतापर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवार यांचे एक अढळ स्थान होते. शरद पवार कोणत्याही क्षणी महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी देऊ शकतात किंवा ते राजकीय वाऱ्याची दिशा बदलू शकतात, अशाप्रकारची सामर्थ्यशाली प्रतिमा जनमानसात होती. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर शरद पवार यांनी उद्धव ठाकरे आणि कॉंग्रेसला सोबत घेऊन महाविकास आघाडीची स्थापना केली होती. हा देवेंद्र फडणवीसांच्या राजकारणाला मोठा शह ठरला होता. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत शरद पवार किमान पश्चिम महाराष्ट्रात तरी भाजप आणि महायुतीचे मनसुबे उधळून लावतील, असे दावे केले जात होते. मात्र, या निवडणुकीत शरद पवार गटाला अवघ्या १५ जागांवर विजय मिळण्याची शक्यता आहे. हा शरद पवार गटासाठी मोठा धक्का ठरला. त्यामुळे शरद पवार यांना राज्यातील वातावरण ओळखण्यात अपयश आल्याची चर्चा सुरु झाली आहे. याउलट भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी ग्राऊंड लेव्हलला अचूक व्यवस्थापन करुन हारलेली लढाई पुन्हा खेचून आणली, असे बोलले जात आहे.



# मेहकर विधानसभा मतदार संघात उबाठाचे सिद्धार्थ खरात विजयी

## संजय रायमुलकर यांचा ४८१९ मताने पराभव

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर लोणार विधानसभा मतदार संघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला राहिला आहे. परंतु, या वेळेस शिवसेना विरुद्ध शिवसेना असा सामना मेहकर विधानसभा मतदार संघात झाला. त्यामुळे मताचे विभाजन होऊन महाविकास आघाडीतील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे उमेदवार सिद्धार्थ रामभाऊ खरात यांचा ४८१९ मताने विजय झाला. तर तब्बल तीन टर्मपासून प्रतिनिधीत्व करीत असलेल्या संजय भाष्कर रायमुलकर यांचा या अटीतटीच्या लढतीत पराभव झाला. मेहकर लोणार विधानसभा मतदार संघात मेहकर लोणार मतदार संघात महायुती, महाविकास आघाडी, वंचित बहुजन आघाडी यासह इतर पक्षाच्या व अपक्ष अशा तब्बल १९ उमेदवारांनी





विधानसभा निवडणुकीमध्ये आमदार होण्यासाठी आपले नशीब आजमावले. यातील प्रमुख लढत महायुती विरुद्ध महाविकास आघाडीमध्ये झाली. मेहकर विधानसभा मतदारसंघासाठी ६४.७६ टक्के झाले होते. यामध्ये महाविकास आघाडीचे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांना १०४२४२ मते मिळाली. तर त्यांचे प्रतिस्पर्धी संजय रायमुलकर यांना ९९४२३ मते मिळाली. यामध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांचा ४८१९ मताने विजय झाला. तर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. सौ.ऋतुजा चव्हाण यांना २०५० मते मिळाली. विजयी उमेवारांच्या समर्थकांनी फटाके फोडून,मिठाई वाटप करून व गुलालाची उधळण करून विजयोत्सव साजरा केला.

## विविध वृत्त...

### भाजपचे आकाश फुंडकर यांची खामगाव मतदार संघात हॅट्रिक



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव विधानसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार ड. आकाश फुंडकर यांनी महाविकास आघाडीच्या काँग्रेसचे उमेदवार दिलीप कुमार सानंदा यांचा पराभव करीत २५४७७ मतांनी विजय मिळवून हॅट्रिक मारली आहे. भाऊसाहेब फुंडकर यांची आठवण करत भाऊसाहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी झटतो आहे दहा वर्षाची पावती मला मिळाली. एक भयमुक्त व विकसनशील खामगाव म्हणून उदयास येणार आहे अशी प्रतिक्रिया देत आकाश फुंडकर यांनी दिली आहे.

### शिंदेंनी 'धोनी' म्हणून उल्लेख केला आमदार पडला; 'काय झाडी, काय डोंगर' फेम शहाजीबापू क्लीन बोल्ड

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेनेतील शिंदेंच्या बंडाला पहिल्या क्षणापासून साथ देणारे, गुवाहाटीतून बंड गाजविलेले आणि प्रचाराच्या काळात खुद्द शिंदेंनी धोनी ठरवलेले शिवसेनेचे आमदार शहाजीबापू यांचा पराभव झाला आहे. शिवसेनेने सांगोल्यातून त्यांना उमेदवारी जाहीर केली होती. मतदारसंघातून शेकापचे बाबासाहेब देशमुख जिंकले आहेत. शहाजीबापूंचा पराभव हा शिंदेंच्या शिवसेनेसाठी मोठा धक्का मानला जात आहे.



एकनाथ शिंदेंचं समर्थन करताना शहाजीबापू हे संजय राऊतच काय तर उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीच्या बड्या बड्या नेत्यांना जहरी शब्दांत सोलून काढत होते. त्याचवेळी एकनाथ शिंदेंच्या अनेक सभांमध्ये शहाजीबापू जोरदार बॅटिंग करत, सभा जिंकत होते. याच शहाजीबापू पाटलांना पराभूत करण्यासाठी उद्धव ठाकरे, संजय राऊत पेटून उठले होते. तरीही, आपण जिंकणार असल्याचं बोलून दाखवत होते. या निवडणुकीतील एका प्रचारसभेत शहाजीबापू हे आमचे धोनी असल्याचे सांगून मुख्यमंत्री शिंदेंनी शहाजीबापूंना सलामीचे आणि ताकदीचे खेळाडू असल्याचे जाहीर केले होते. मात्र, आता शिंदेंचे धोनी चक्क क्लिनबोल्ड झाल्याचे निकालाच्या आकड्यांनी दाखवून दिले आहे. नवख्या शेकाप उमेदवार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी २३ हजार मतांनी धूळ चारली आहे. आपला विजय शेकापचे कार्यकर्ते आणि यांना सम र्पित असून आबासाहेबांना सांगोल्याच्या जनतेने श्रद्धांजली वाहिली असल्याची प्रतिक्रिया डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी दिली आहे.

### जतमध्ये तिरंगी लढतीत भाजपच्या गोपीचंद पडळकर यांची बाजी, काँग्रेसच्या विक्रमसिंह सावंतांचा पराभव

दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** कायम दुष्काळी तालुका अशी ओळख असलेल्या जत विधानसभा मतदारसंघात भाजपचे विधानपरिषदेचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी बाजी मारली. जत विधानसभा म तदारसंघात भाजपच्या गोपीचंद पडळकर यांनी विजय मिळवला. त्यांनी काँग्रेसच्या विक्रमसिंह सावंत यांचा ३७,८८१ मतांनी पराभव केला. गोपीचंद पडळकर यांना १,११,९०६ मतं मिळाली. तर काँग्रेसच्य विक्रमसिंह सावंत यांना ७४,०२५ मतं मिळाली.



काँग्रेसने विद्यमान आमदार विक्रमसिंह सावंत यांना उमेदवारी दिली होती. त्याचवेळी भाजपचे बंडखोर तमनगौडा रवीपाटील यांच्या उमेदवारीने या निवडणुकीत रंगत निर्माण झाली होती. सांगली जिल्ह्यातील आठपैकी जत विधानसभा मतदारसंघ हा एकमेव मतदारसंघ होता की ज्या ठिकाणी लोकसभेच्या निवडणुकीत भाजपला मताधिक्य मिळालं आहे. गोपीचंद पडळकर हे मूळचे आटपाडी येथील असल्यामुळे जत भाजपमध्ये भूमिपुत्र विरुद्ध आयात असा संघर्ष बंडखोरीच्या वळणावर पोचला होता. अशाही स्थितीत गोपीचंद पडळकर यांनी बाजी मारली.

### चिपळूण विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीच्या शेखर निकमांची बाजी, मविआचा उमेदवार पराभूत

दैनिक आपला विदर्भ

**चिपळूण/प्रतिनिधी :** चिपळूण विधानसभा निवडणूक २०२४ चा निकाल आता लागला आहे. या चुरशीच्या लढतीत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शेखर निकम यांचा विजय झाला आहे. तर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या प्रशांत यादव यांचा पराभव झाला आहे. सध्या चिपळूण मतदारसंघाचे आमदार हे शेखर निकमच आहेत, तेच पुन्हा एकदा निवडून आले आहेत.

# स्व. भागूबाई मुखमाले यांचे मरणोत्तर नेत्रदान

## मुखमाले परिवारातील दुसरे नेत्रदान

## मरावे रुपी किर्तीरुपी उरावे असे आदर्श कार्य

दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी :** मालेगाव तालुक्यातील चिवरा येथील डॉ. किशोर मुखमाले यांची आजी व आदर्श व्यक्तीमत्व मधुकर मुखमाले यांची आई स्व. भागूबाई कुंडलिक मुखमाले यांच्या वयाच्या ८४ व्या वर्षी २१ नोव्हेंबर रोजी निधन झाले. निधनानंतर मुखमाले परिवाराने नेत्रदानाचा निर्णय घेत स्व. भागूबाई मुखमाले यांचे नेत्रदान करून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. मरावे रुपी किर्तीरुपी उरावे, असे आदर्श कार्य केले आहे. स्व.भागूबाई मुखमाले ह्या मुखमाले कुंटुबातील आधारस्तंभ होत्या. त्या सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या तसेच समाजकार्याची आवड असलेल्या स्व.भागूबाई कुंडलिक मुखमाले यांचे निधन झाल्याने संपुर्ण मुखमाले कुटुंबावर दुःखाचा डोंगर उभा



असताना मुखमाले कुंटुबीयांनी एवढ्या दुखामध्येही मुत्यनंतर नेत्रदान क्ररुन दोन अंधाच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्यासाठी नेत्रदान करण्याची इच्छा जिल्हा रुग्णालयाचे अति. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी याच्यांकडे व्यक्त केली. त्यानुसार जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, नेत्र शल्यचिकित्सक, डॉ. आशिष बेदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्र चिकित्सा अधिकारी ज्ञानेश्र्वर पोटफोडे व नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे यांनी स्व. भागूबाई कुंडलिक मुखमाले यांची नेत्र बुबुळे काढली व नेत्र बुबुळे त्याच दिवशी वैद्यकिय महाविद्यालय, अकोला येथे पाठविण्यात आली. तरी सदरील नेत्रदान करण्याकरीता मुखमाले कुंटुबाचे सहकार्य लाभले. मृत्यूनंतर जवळच्या व्यक्तीचे त्वरीत नेत्रदान घडवून आणावे व नेत्रदाना नंतरच मृतावर अंतिम संस्कार करावे, असे अवाहन अंधत्व नियंत्रण कार्यक्रमाचे कार्यकारी समितीचे अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे व जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. अनिल कावरखे यांनी केले असून मुखमाले कुटुंबाचे आभार मानले आहेत.मुखमाले कुटुंबाने २०१० मध्ये स्व.वामन मुखमाले यांचे नेत्रदान केले होते, हे मुखमाले परिवारातील दुसरे नेत्रदान आहे.

# 'पुन्हा निवडणुका घ्या', विधानसभा निकालानंतर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेची मागणी

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभेच्या निकालाचे कौल समोर आले आहेत. हळुहळू चित्र स्पष्ट होऊ लागले आहेत. आतापर्यत आलेल्या कलानुसार २२५ जागांवर महायुती पुढे आहे. तर महाविकास आघाडी ५० जागांवर आहे. महायुती सत्ता स्थापन करण्याच्या दिशेने वाटचाल करतान दिसत आहे. हे निकाल महाविकास आघाडीसाठी धक्कादायक आहेत. यावर आता उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

महाराष्ट्राचा निकाल हा जनतेचा कौल नाही. बॅलेट पेपर म्हणजेच मतपत्रिकावर पुन्हा निवडणूक घ्या!, अशी मागणी संजय राऊत यांनी केली आहे. जगाच्या पाठीवर निवडणुकीत इतका फ्रॉड झाला नसेल, असे राऊत म्हणाले. हा निकाल मान्य नाही! नाही! त्रिवार नाही! लोकशाही आणि महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची लढाई सुरूच राहील, असेही राऊत पुढे म्हणाले.

लाडकी बहीण योजनेमुळे महायुतीचा इतका मोठा विजय झाला असावा यावर संजय राऊत म्हणाले, ''मला असे वाटत नाही. महाराष्ट्रात लाडके भाऊ, लाडके मामा, लाडके काका, लाडके आजोबा, लाडके दादा नाहीयेत का? मी परत सांगतो की, ही मोठी गडबड आहे. महाराष्ट्रावर अदानींचं बारीक लक्ष होतं. काल अटक वॉरंट निघाल्यानंतर असा निकाल लागेल अशी आमच्या मनात शंका होती. अमेरिकेत अदानींवर जे भ्रष्टाचाराचे आरोप झाले ते अप्रत्यक्षपणे भाजपावरच होते. या निवडणुकीत सर्वात जास्त पैशांचा वापर, ताकद अदानींनी केला. या निकालावर गौतम अदानींचा प्रभाव आहे का? कारण मोदी, फडणवीस, शिंदे आणि अदानी हे वेगळे नाहीत''.

''शरद पवारांनी म हाराष्ट्रात तुफान उभे केले होते. त्यांना तुम्ही १० जागा देण्यासही तयार नाही. नेमकी अशी काय गडबड महाराष्ट्रात आहे. हा निकाल जनतेचा कौल आहे हे मानण्यास आम्ही तयार नाही. निवडणुकीत जय-पराजय होत असते, आम्हाला त्यावर काही बोलायचे नाही. पण लावून घेतलेल्या निकालावर माझ्यासारख्या लोकशाही मानणाऱ्या माणसाचा विश्वास बसू शकत नाही,'' असेही संजय राऊतांनी सांगितले. पुढे ते म्हणाले की, ''पैशांचा वापर झाला आहे, याच्याविषयी माझ्या मनात शंका नाही. एकनाथ शिंदेंचे सर्व आमदार कसे काय निवडून येऊ शकतात? ज्यांच्या गद्दारी, बेईमानीविरोधात म हाराष्ट्रात रोष आहे त्या अजित पवारांना इतक्या जागा कशा? शरद पवारांच्या सभांना तुफान प्रतिसाद मिळाला होता''.

### बारामतीत कांटे की टक्कर! बालेकिल्ल्यात अजित पवारांना रेकॉर्ड ब्रेक मते, शरद पवारांना धक्का

**बारामती/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीमध्ये देखील बारामती मतदारसंघाम ध्ये पवार विरूध्द पवार अशी लढत झाली. या बारामती मतदारसंघारडे संपूर्ण राज्यासह देशाचे लक्ष्य लागले होते. या निवडणुकीमध्ये अजित पवारांनी पुन्हा एकदा मोठा विजय मिळवला आहे. अजित पवारांना १९६६४० तर युगेंद्र पवारांना ८०४५८ इतकी मते मिळाली आहेत. अजित पवार १,१६,१८२ मतांनी विजयी झाले आहेत. अजित पवारांना गेल्या विधानसभा निवडणुकीत पडलेली तशीच रेकॉर्डब्रेक मते मिळाली आहेत.

लोकसभा निवडणुकीप्रमाणेच विधानसभा निवडणुकीतही आपल्या पुतण्याला पराभूत करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांनी शर्थीचे प्रयत्न सुरू केले होते. शरद पवार यांच्या सुप्रिया सुळे यांना लोकसभा निवडणुकीत पराभूत करण्यासाठी अजित पवार यांनी पत्नी सुनेत्रा पवार यांना उमेदवारी दिली होती, त्यानंतर आता शरद पवारांनी बारामतीत अजित पवार यांच्याविरोधात त्यांचेच पुतणे युगेंद्र पवार यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे आता या मतदारसंघाच्या निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते.

# हर-घर आयुर्वेदासाठी प्रकृती परिक्षण अभियानात आयुर्वेद उत्पादक कंपन्यांनी व संघटनांनी सहभागी व्हावे

## केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आयुर्वेदाचा प्रचार-प्रसार देशामध्ये होण्याच्या दृष्टीकोनातून हर घर आयुर्वेद निसर्ग चाचणी (प्रकृती परिक्षण) अभियान देशात राबविल्या जात असून या अभियानात आयुर्वेद उत्पादक कंपन्यांनी आणि संघटनांनी सहभागी होऊन या अभियानाला गती द्यावी असे आवाहन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात संपूर्ण देशामध्ये आयुर्वेदाचा प्रचार-प्रसार मोठया प्रमाणात होत आहे. आयुर्वेदीक अर्थव्यवस्थेला विकासाच्या मार्गावर नेण्यासाठी निसर्ग चाचणी (प्रकृति परीक्षण) अभियान संपूर्ण देशामध्ये राबविण्यात येत आहे. या अभियाना संदर्भातील बैठक आज दि. २२ नोव्हेबरला आरोग्य मंत्रालयात केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला आयुष मंत्रालयाचे सचिव वैद्य राजेश कोटेचा,भारतीय चिकीत्सा पध्दती राष्ट्रीय आयोगाच्या सभापती वैद्य जयंत देवपुजारी, देश का प्रकृतीक परीक्षण अभियानाच्या समितीचे सचिव डॉ. आशुतोष गुप्त उपस्थित होते तर देशातील आयुर्वेदीक उत्पादक कंपनीचे संचालक तसेच आयुर्वेद संघटनेचे पदाधिकारी दुरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. सर्वसामान्य नागरीकांचा कल हा आयुर्वेदीक उपचार पध्दतीकडे वाढत आहे. या दृष्टीकोनातुन केंद्र सरकारच्या वतीने हर-घर आयुर्वेद उपक्रमाअंतर्गत निसर्ग चाचणी (प्रकृति परीक्षण) अभियान संपुर्ण देशामध्ये राबविण्यात येत आहे. या अभियानामध्ये सहभागी होवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची हर घर आयुर्वेद ही संकल्पना पुर्णत्वात नेण्यासाठी सर्वांनी सहयोग देवून हे अभियान यशस्वी करावे असे आवाहन केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री श्री. प्रतापराव जाधव यांनी यावेळी केले.

